महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
**महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळ,**
शासकीय तंत्र निकेतन इमारत, क - विभाग, दुसरा मजला, 49, अलियावर जंग मार्ग, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400051
दूरध्वनी क्रं. (022) 26474435 / 2647 3818 वेब- www.msbve.gov.in ईमेल - msbve2003@yahoo.com

जा.क्र.मराकौविपमं/का-12/ शैक्षणिक विभाग/ 589/2020 दिनांक :- 14.10.2020

**परिपत्रक**

**मंडळाच्या प्रवेशाबाबत सूचना - दहावी उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता असणाऱ्या अभ्यासक्रमांकरीता,**

सद्यस्थितीत दहावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना देखिल पुढील शिक्षणासाठी तात्पुरता प्रवेश देण्यात येतो. व सदर उमेदवाराला पुरवणी परीक्षेत यश मिळाल्यास त्यांचे सदर प्रवेश नियमीत करण्यात येतात.

तथापि अद्याप पावेतो महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या ज्या अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक पात्रता इयत्ता दहावी उत्तीर्ण अशी आहे, त्या सर्व अभ्यासक्रमांना इयत्ता दहावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यास प्रवेश देत नाही. तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान टाळण्याकरीता मंडळाने खालिलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

- **मंडळाच्या ज्या अभ्यासक्रमांना इयत्ता दहावी उत्तीर्ण अशी शैक्षणिक पात्रता आहे अशा सर्व अभ्यासक्रमांना इयत्ता दहावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यास त्यांचे मागणीनुसार खाली नमुद केल्याप्रमाणे तात्पुरता प्रवेश देता येईल.**
- **आणि सदर विद्यार्थी पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतरच त्याचा प्रवेश नियमित करण्यात येतील व त्यांना सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस बसण्याची संधी मिळेल, असे संबंधित विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाचे वेळीच शपथपत्रावर लिहून घेण्यात यावे.**

अशाप्रकारे शैक्षणिक पात्रतेमध्ये लहानसा बदल केल्यास विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार नाही, तसेच त्यांना पुढील शिक्षणाची व कौशल्य संपादन करण्याची संधी उपलब्ध होईल.

सदर नियमांचे पालन सत्र 2020-21 च्या प्रवेश प्रक्रियेपासून अंमलात आणावेत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अ. म. जाधव)
अध्यक्ष
म.रा.कौशल्य विकास परीक्षा मंडळ,
मुंबई 400 051

प्रत – खालिलप्रमाणे सर्वांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

1) मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुख्य इमारत, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – 400 032
2) मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई -1
3) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय मुंबई / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपुर
4) सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यांचे कार्यालये
5) मंडळाच्या मान्यता प्राप्त सर्व संस्था (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यांचे मार्फत)
6) मंडळ कार्यालयातील सर्व कार्यासने, यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे उचित कार्यवाही करावी.
7) संगणक विभाग, उपरोक्त परिपत्रक मंडळाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.